# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक :- ७४-२३** **दिनांक :- ०३/०३/२०२३**

## खुनाच्या गुन्हयातील अरोपीतास गुन्हा दाखल झालेपासुन २४ तासांत अटक तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २५.०२.२०२३ रोजी रात्री ०२.१५ वाजताचे सुमारास पो.अंम. गुनानाथ नारायण भोये हे रात्रौ. गस्त करीत असताना आत्म वल्लभ बिल्डींग समोर, तुळींज ओव्हर ब्रिजचे खाली, नालासोपारा (पूर्व) येथे एक इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे त्याचे चेह-यावर उजव्या डोळयाचेवर कपाळावर ताज्या माराची कापीव जखम तसेच डाव्या डोळयाचेवर कपाळावर बोथट ताजी जखम व त्यातुन रक्तस्त्राव झालेल्या जखमी अवस्थेत दिसुन आल्याने त्यास उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालय वसई-विरार येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास दाखलपूर्व मयत घोषीत केले. सदर मयत याच्या मृत्युचे नेमके कारण समजुन येत नसल्याने पो. अंम. गुनानाथ नारायण भोये, नेम. तुळींज पोलीस ठाणे यांनी दिलेल्या खबरीवरुन प्रथमतः फौ.प्र.स. कलम १७४ अन्वये अकस्मात मृत्यू नोंद क्रमांक ३१/२०२३ दाखल करण्यात आला होता.

सदर मयत इसमाचा मृत्यु हा संशयास्पद वाटत असल्याने घडलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांची २ स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या तांत्रिक विश्लेशनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे अरोपीत नामे आरोपीत नामे दिपक विनोद गुप्ता उर्फ बटला, रा. सुधा मेडीकल, भोयदा पाडा, ता.वसई, जि.पालघर यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता मयत पप्पु यास अरोपीत याने २८०/- रुपये दिले होते ते मयत पप्पु याने परत न करता अरोपीस शिवीगाळी केल्याने त्याचे डोकयात दगड मारुन खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीतास दिनांक २६.०२.२०२३ रोजी अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/संतोष सोलनकर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ २ वसई, डॉ. श्री. शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग तथा अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, पांडुरंग केंद्रे ,पो. अंम. छपरीबनराऊत यांनी केली आहे.

-------oooo-------.